आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१३ ऑक्टोबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- पीएम गतीशक्ती बृहद् आराखड्यामुळे विकसित भारत उपक्रमाला नवीन गती मिळेल असा प्रधानमंत्र्यांना विश्वास

- संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबवण्यात येणार

- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी दोन जणांना अटक

- महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा विरोधकांचा आरोप

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पावसाचा परतीचा प्रवास येत्या दोन दिवसात पूर्ण होईल, असा हवामानविभागाचा अंदाज

**<><><><><>**

पीएम गतीशक्ती बृहद् आराखडा सर्व क्षेत्रात वापरला जात आहे यामुळे विकसित भारत उपक्रमाला नवीन गती मिळेल असा विश्वास आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं असलेल्या पीएम गतीशक्ति अनुभूती केंद्राला मोदी यांनी आज अचानक भेट दिली. पीएम गतीशक्तीची मुख्य वैशिष्ट्ये, यश आणि मुख्य टप्पे या अनुभूती केंद्रात दर्शवले आहेत. पीएम गतीशक्ती बृहद् आराखड्याला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. या उपक्रमामुळे देशभरातील प्रकल्पांचे वेगवान नियोजन आणि अंमलबजावणी झाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं. पीएम गतीशक्ती बृहद् आराखड्याचा वापर करुन कोळसा, पोलाद,

खते, बंदरे, अन्नधान्य आणि सार्वजनिक वितरण या अर्थव्यवस्थेच्या मुख्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांमधल्या पहिल्या आणि अखेरच्या टप्प्यातल्या संपर्क सुविधांशी संबधित त्रुटीचाही मागोवा संबधित मंत्रालयांनी घेतला आहे. अंगणवाडी नियोजनातही याचा प्रभावी वापर झाला आहे.

**<><><><>**

भारतीय संविधानाला येत्या २६ नोव्हेंबर रोजी ७५ वर्ष पूर्ण होत आहेत, या निमित्ताने केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबवण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार काही घटकांकडून होत आहे, या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन रिजीजू यांनी केलं.

**<><><><>**

संयुक्त राष्ट्र दिनानिमित्त येत्या २४ ऑक्टोबरला, केंद्र सरकारचे सर्व विभाग, राज्य सरकारं तसंच केंद्रशासित प्रदेशांनी आपल्या सर्व प्रमुख कार्यालयीन इमारतींवर संयुक्त राष्ट्रांचा ध्वज आणि राष्ट्रीय ध्वज तिरंगा फडकवावा, असे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयानं दिले आहेत. मात्र राष्ट्रपती भवन, उपराष्ट्रपती भवन, संसद भवन, सर्वोच्च न्यायालयाची इमारत, देशभरातली उच्च न्यायालयं, राजभवन, राज निवास किंवा विधानपरिषद आणि विधानसभेच्या इमारतींवर संयुक्त राष्ट्राचा ध्वज फडकवू नये, असं मंत्रालयानं जारी केलेल्या निर्देशात म्हटलं आहे.

**<><><><>**

जिनिव्हा इथं आयोजित आंतर संसदीय संघाच्या एकशे एकोणपन्नासाव्या बैठकीमध्ये लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली भारतीय प्रतिनिधीमंडळ सहभागी होत आहे. ही बैठक येत्या १७ तारखेपर्यंत चालणार असून

शांततापूर्ण आणि शाश्वत भविष्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाचा वापर ही या बैठकीची संकल्पना आहे. तसंच यानिमित्तानं विविध देशांच्या संसद सदस्यांशी चर्चा करणार आहेत. भारताच्या प्रतिनिधिमंडळात राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंग, दोन्ही सभागृहांचे महासचिव आणि काही खासदारांचा समावेश आहे. यामध्ये १८० संसद सदस्य आणि १८ सहयोगी सदस्य आहेत.

**<><><><><>**

इस्त्रायल आणि इराण यांच्यातला संघर्ष, कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली भरमसाठ वाढ यामुळे विदेशी गुंतवणूकदार संस्थांनी ऑक्टोबर महिन्यात भांडवली बाजारातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेतली आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी या महिन्यात ५८ हजार ७११ कोटी रुपयांच्या समभागातून गुंतवणूक काढून घेतली. चीनमधल्या भांडवली बाजारांमधे चांगलं वातावरण राहिल्याचाही परिणाम भारतीय भांडवली बाजारांवर झाल्याचं दिसतं.

गेल्या नऊ महिन्यांच्या कालावधीत सप्टेंबर महिन्यात सर्वाधिक म्हणजे ५७ हजार ७२४ कोटी रुपयांची गुंतवणूक परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी केली होती.

**<><><><><>**

केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आज मुंबईतल्या वांद्रे रेल्वे स्थानकातून वांद्रे - लालकुआँ सुपर फास्ट एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. या कार्यक्रमाला आमदार आशिष शेलार हे देखील उपस्थित होते. या साप्ताहिक रेल्वेगाडीमुळे मुंबई आणि उत्तराखंड दरम्यानचा प्रवास सुखकर होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात माझी लाडकी बहीण योजनेसह कोणत्याही कल्याणकारी योजना बंद होणार नाहीत अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. नांदेडमध्ये आयोजित महिला सशक्तीकरण अभियान मेळाव्यात ते बोलत होते. वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी अन्नपूर्णा योजना, मुलींना मोफत शिक्षण अशा योजनांचा उल्लेख करत या योजना म्हणजे महिलांना कायमस्वरुपी ओवाळणी आहे असं त्यांनी सांगितलं. युवकांना भत्त्यासह प्रशिक्षण देणारं देशातलं महाराष्ट्र हे पहिलंच राज्य आहे असं ते म्हणाले. मुंबईतल्या विविध प्रकल्पांचं आणि विकासकामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत केलं. मराठी भाषा भवनाच्या भूमीपूजनासह जवाहर बालभवन, सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी वसतीगृह यांच्या नवीन इमारती, तसंच दादर भायखळा नायगाव शिवडी शीव इथल्या पोलीस वसाहतींचं लोकार्पण अशा अनेक विकासकामांचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी दोन जणांना अटक असून त्यातल्या एकाला येत्या २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली तर दुसऱ्याच्या वयाची चाचणी झाल्यानंतर त्याला पुन्हा हजर करण्याचे आदेश न्यायालयानं पोलिसांना दिले.तिसरा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेची १५ पथकं सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास करत असून अन्य राज्यांच्या पोलिसांची मदतही घेण्यात येत आहे, अशी माहिती गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकाऱ्यांनी वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><><>**

बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर आणखी काही वेळातच शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईत सर्वत्र पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

बाबा सिद्दिकी यांच्या मृत्यूबद्दल अनेक नेत्यांनी शोक प्रकट केला आहे.

राजकीय नेत्याची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, असा आरोप करत गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**<><><><><>**

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी केला आहे. राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते. महिलांवर अत्याचार होत आहेत, राजकीय नेते सुरक्षित नाहीत मग जनतेच्या सुरक्षेचं काय? असं म्हणाले.

देशाच्या राजकारणात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा एक वेगळा दबदबा होता मात्र सध्याच्या सरकारनं हा नावलौकिक धुळीला मिळवला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी यावेळी केली. राज्य सरकारनं गेल्या दोन तीन महिन्यात अनेक निर्णय घेतले, या निर्णयांची अंमलबजावणी होणं शक्य आहे का? असा सवाल त्यांनी केला.

राज्यात दररोज ७ शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्याची दखलही राज्य सरकार घेत नसल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करायला केंद्राचं पथक आंध्र प्रदेशात गेलं मात्र महाराष्ट्रात आलं नाही असा उल्लेख त्यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अग्निवीर योजनेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केलं असून ही योजना म्हणजे आपल्या वीर जवानांच्या बलिदानाचा अपमान असल्याचं म्हटलं आहे. नाशिक मध्ये प्रशिक्षणादरम्यान दोन अग्निवीरांचा मृत्यू झाल्याच्या घटनेच्या संदर्भात ते बोलत होते. लष्करी सेवेतल्या इतर जवानांप्रमाणे या दोघांच्या कुटुंबांना सरकारकडून नुकसान भरपाई मिळणार का? असा सवाल त्यांनी केला.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या योजना माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारितील माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत योग्यरित्या पोहोचवल्या जात आहेत, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज सांगितलं.

**नागपूर** इथं माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत विविध प्रसार माध्यमांच्या अधिका-यांच्या आढावा बैठकीनंतर ते आकाशवाणी इथे बोलत होते. या वेळी पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्यूरो, दूरदर्शन आणि आकाशवाणीचे अधिकारी उपस्थित होते.

**विदर्भात** आकाशवाणी, दूरदर्शन बरोबरच अमरावतीची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन -आयआयएमसी देखील माहिती प्रसारणासाठी उपयुक्त ठरत आहे, असं जाजू यांनी सांगितलं. या सर्व संस्थामध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सोयी-सुविधांबाबत या आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस **बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड आणि सिक्कीममधून** पूर्णपणे परतला असून **छत्तीसगढ, मध्यप्रदेश, मेघालय, आसाम आणि ओदिशातल्या** आणखी काही भागातून मागे सरला आहे. येत्या दोन दिवसात मान्सून देशातून पूर्णपणे परतेल असा हवामानविभागाचा अंदाज आहे.

येत्या दोन दिवसात **तमिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळ आणि आंध्र किनारपट्टीवर** जोरदार पाऊस पडेल तर **गुजरात, महाराष्ट्र, गोवा, मध्यप्रदेश, आणि छत्तीसगढमधे** पुढचा आठवडाभर हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस राहील असा वेधशाळेचा अंदाज आहे.

**<><><><><>**

परतावा मिळवण्यासाठी ग्राहकांना त्यांच्या पसंतीचे पर्याय उपलब्ध करून द्यावेत असे निर्देश केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं ओला या परिवहन कंपनीला दिले आहेत. परताव्याचे पैसे थेट बँक खात्यात पैसे जमा करण्याची किंवा कुपनद्वारे परतावा मिळवण्याची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून द्यावी, असं प्राधिकरणानं तक्रार निवारण प्रक्रियेदरम्यान सांगितलं आहे. व्यवहारात पारदर्शकता यावी या उद्देशानं, बुकिंग करून ओला द्वारे प्रवास करणाऱ्यांना पावती देण्याचे निर्देशही प्राधिकरणानं दिले आहेत.

**//<><><><><>//**